MHAH060024022022

दाखल दिनांकः १३/१०/२०२२

नोंदणी दिनांकः १३/१०/२०२२

निकाल दिनांकः १५/०१/२०२४

| कालावधी : | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|
| | ०१ | ०३ | ०२ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.३,श्रीरामपूर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारीः श्रीमती डी.एस.खोत)**

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र.१५३०/२०२२** **नि.क्र.१७**

**महाराष्ट्र शासन,**
द्वारा पोलीस निरीक्षक,
तालुका पोलीस ठाणे, श्रीरामपूर,
ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर. ..**अभियोग पक्ष**

**विरुध्द**

**ज्ञानदेव धोंडीराम गायकवाड,**
वयः –५६ वर्षे, व्यवसायःमजुरी,
रा. खळवाडी,टाकळीभान,
ता. श्रीरामपूर,जि. अहमदनगर. ..**आरोपी**

**दोषारोप** : महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५(ई)प्रमाणे.

**विधिज्ञांची नावे :** सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्री.एस.बी.चिंतेवार.
आरोपीतर्फे ॲड. श्री.एम.बी. मोमले.

**(न्यायनिर्णय)**

(घोषित दि.१५.०१.२०२४)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये बेकायदा ३५ लिटर गावठी हातभट्टीची दारू विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःचे कब्जात

बाळगतांना मिळून आल्याचे कारणांकरिता खटला चालविण्यात आला.

**<u>अभियोग पक्षाचा खटला थोडक्यात खालीलप्रमाणे,</u>**

२. फिर्यादी पोलीस हेड.कॉन्स्टेबल विजयकुमार बाळासाहेब वेठेकर हे दिनांक २७/०७/२०२२ रोजी ते तसेच पो.ना.विशाल दळवी, पो. ना.शंकर चौधरी असे पोलिस निरिक्षक कटके यांच्या आदेशाने श्रीरामपूर हद्दीत अवैद्य धंद्यांवर कारवाई करत असताना पो.ना.दळवी यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, इसम नामे ज्ञानदेव गायकवाड रा.टाकळीभान, खळवाडी, ता.श्रीरामपुर हा विनापरवाना बेकायदेशीरपणे गावठी गातभट्टीच्या दारूची चोरून विक्री करत आहे. त्यावरून पो.ना मुंडले यांनी लागलीच दोन पंचाना बोलावून घेवून त्यांना बातमीतील हकिकत समजावून सांगितली. त्यानंतर सदर माहिती वरून ते व इतर पोलीस स्टाफ दोन पंचासह बातमी मिळालेल्या ठिकाणी जावुन छापा टाकला असता एक इसम मिळून आला. सदर इसमाला त्यांनी जागीच पकडून त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव ज्ञानदेव धोडीराम गायकवाड रा. टाकळीभान, खळवाडी, ता.श्रीरामपुर असे असल्याचे सांगितले. त्याच्या ताब्यातून ३५ लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू एका पांढ–या रंगाच्या ड्रम मध्ये असा अंदाजे एकुण रक्कम रूपये ३५००/– किमंतीचा माल मिळून आला.

३. त्यानंतर पो. ना. मुंडले यांनी दोन पंचासमक्ष पंचनामा करुन मुद्देमाल जप्त केला. जप्त मालातून रासायनीक तपासणीकामी १८० मिली मापाच्या बाटलीमध्ये सॅम्पलसाठी दारू राखून ठेवली. त्यानंतर ते आरोपी व मुद्देमाल घेवून पोलिस स्टेशनला आले. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दिली.

४. फिर्यादीवरुन श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे अंमलदार यांनी आरोपी विरुध्द अपराध क्र.III–२५८/२०२२ अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा नोंदविला. सदर गुन्हयाचा तपास तपासी अंमलदार पो. ना. मुंडले यांनी केला. त्यांनी तालुका पोलीस ठाणे अंमलदार यांचे मार्फत महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई)अन्वये आरोपीविरुध्द गुन्हयाचा तपशिल नोंदवला.

५. निशाणी क्र. ०६ वर महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत आरोपीस तपशिल सांगितला. उक्त तपशील आरोपीने अमान्य असल्याचे सांगून संपरीक्षेची मागणी केली. आरोपीविरुध्द दोषात्मक पुरावा आढळून आल्यामुळे फौ.प्र.स. कलम ३१३(१)(ब)आरोपीचे निवदेन निशाणी क्र.१६अन्वये नोंदविण्यात आले.

६. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. मुद्दे व त्यावरील कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे.

**<u>मुद्दे</u>**

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे शाबित केले का की दि.२७/०७/२०२२ रोजी आरोपी टाकळीभान, खळवाडी ता.श्रीरामपूर येथे ३५ लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू एका पांढ-या रंगाच्या ड्रम असा एकुण रक्कम रूपये ३५००/- किंमतीचा माल विनापरवाना बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःचे ताब्यात बाळगतांना मिळून आला व त्यायोगे त्याने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा केला? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**<u>कारणमिमांसा</u>**

७. अभियोग पक्षाने आरोपीवर ठेवलेले दोष सिध्द करण्यासाठी पंच बाबा ईमाम सय्यद साक्षीदार क्र.१ निशाणी क्र.०७ वर व तपासी अंमलदार पो.ना.मुंडले साक्षीदार क्र.२ यांना निशाणी क्र.११ वर तपासलेले आहे.

**<u>मुद्दा क्र. १ करिता</u>**

८. महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) नुसार अभियोग पक्षाने आरोपी याने मादक द्रव्य गावठी हातभट्टीची दारू विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीररित्या जवळ बाळगतांना मिळून आल्याचे शाबीत करणे गरजेचे आहे.

९. पंच बाबा ईमाम सय्यद (सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्यात दिनांक २७/०७/२०२२ रोजी त्यांना तालुका पोलीस स्टेशनला बोलवले होते. ते पोलीसांसोबत कारवाईसाठी कोठेही गेले नाही. त्यांचे समक्ष पोलीसांनी जप्ती पंचनामा केला नाही. पंचनाम्यावरील सही व्यतिरिक्त संपुर्ण मजकुर नाकारलेला आहे.

१०. तपासी अंमलदार पो.ना.मुंडले (सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले की, दिनांक २७/०७/२०२२ रोजी ते तसेच त्यांचेसोबत पो.हे.कॉ.वेठेकर, पो.ना.विशाल दळवी, पो.ना.चौधरी असे श्रीरामपूर शहरात अवैद्य धंद्यांवर कारवाई करत असताना पो.ना.दळवी यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, ज्ञानदेव गायकवाड, रा.टाकळीभान हा गावठी गातभट्टीच्या दारूची चोरून विक्री करत आहे. त्यावरून त्यांनी लागलीच दोन पंचाना बोलावून घेवून त्यांना बातमीतील हकिकत समजावून सांगितली. त्यानंतर सदर माहिती वरून ते व इतर पोलीस स्टाफ दोन पंचासह बातमी मिळालेल्या ठिकाणी जावुन छापा टाकला असता एक इसम घराच्या भिंतीच्या आडोशाला दारुची विक्री करताना मिळून आला. सदर इसमाला त्यांनी जागीच पकडून त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव ज्ञानदेव धोडीराम गायकवाड रा. टाकळीभान, खळवाडी, ता.श्रीरामपुर असे असल्याचे सांगितले. त्याच्या ताब्यातून ३५ लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू असा अंदाजे एकुण रक्कम रूपये ३५००/– किमंतीचा माल मिळून आला. त्यानंतर त्यांनी दोन पंचासमक्ष निशाणी क्र.१२ नुसार पंचनामा करुन मुद्देमाल जप्त केला व जप्त मालातून रासायनीक तपासणीकामी १८० मिली मापाच्या बाटलीमध्ये सॅम्पलसाठी दारू राखून ठेवली. त्यानंतर फिर्यादी पो.हेड.कॉ.वेठेकर यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दिली. सदरची फिर्याद

ठाणे अंमलदार यांनी गु.र.क्र.२५८/२०२२ नुसार नोंद करून घेऊन निशाणी क्र.१३ वरील लेखी आदेशाने त्यांच्याकडे तपासकामी दिली. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीला समजपत्र दिले. त्यानंतर त्यानंतर त्यांनी सॅम्पल तपासणीसाठी न्याय वैदयकीय प्रयोगशाळा नाशिक यांच्याकडे पाठवले. त्यानंतर त्यांनी रासायनिक तपासणी अहवाल निशाणी क्र.१५ प्राप्त करुन घेवून दोषारोपपत्रात सामिल करुन घेतला. तपासादरम्यान आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोप पत्र पाठविले. आरोपीला पाहिल्यास ते ओळखू शकतात. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये हे मान्य केले की, त्यांनी घटनास्थळाची मालकी दर्शविणारे कागदपत्र दोषारोपपत्रासोबत दाखल केलेले नाहीत तसेच छापा टाकण्यापुर्वी त्यांनी बनावट गि–हाईक पाठवून आरोपी दारूची विक्री करतो का याबाबत खात्री केली नाही.

११. अभियोग पक्षाचे कथन आहे की, आरोपीच्या ताब्यातून गावठी हातभट्टीची दारू जप्त केली. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल दाखल केलेला असला तरी सदर मुद्देमाल दिनांक २७/०७/२०२२ रोजी जप्त केला असुन तो रासायनीक तपासणीसाठी दिनांक २८/०९/२०२२ रोजी नाशिक येथे पाठविण्यात आला. नाशिक येथे सदर मुद्देमालाची तपासणी दिनांक ०२/१२/२०२२ रोजी करण्यात आली. सदर रासायनीक तपासणीस विलंब झाल्याचे दिसते. यावरून असे दिसून येते की, जप्त मुद्देमालाची तपासणी वेळेत झाली नाही. पंच साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही, त्यामुळे पंचनामा सिध्द झालेला नाही. तसेच सदर प्रकरणात फिर्यादीस तपासलेले नाही त्यामुळे पंचनामा देखील सिध्द झालेला नाही. या प्रकरणात अभियोग पक्षाने स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदवलेली नाही. त्यामुळे आरोपी तिच्या ताब्यात गावठी हातभट्टी दारू विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगून होती ही बाब संशयापलिकडे सिध्द होत नाही. त्यामुळे सदर साक्षीदारांच्या साक्षीमधून आरोपीविरूध्द कोणताही गुन्हा शाबीत होवू शकत नाही. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपीविरूध्द सदरचा गुन्हा शाबीत करण्यास पूर्णपणे अपयशी ठरला आहे. त्यामुळे मुद्दो क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करिता</u>**

१२. अभियोग पक्षाने आरोपी त्याच्याजवळ बेकायदेशीररीत्या गावठी हातभट्टीची दारू विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःच्या जवळ बाळगतांना मिळून आल्याचे शाबीत केले नाही. मुद्दा क्र.१ वरील निष्कर्ष प्राप्ती नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराध आरोपीविरुध्द सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरल्यामुळे सदर आरोपामधून आरोपी निर्दोष होण्यास पात्र आहे. करिता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. आरोपी ज्ञानदेव धोंडीराम गायकवाड यांची महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रदद करण्यात येते.

३. आरोपीने फौ.प्र.स. ४३७(अ) प्रमाणे पुढील सहा महिने करिता रु. १५०००/– वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

४. गुन्हयातील जप्त मुद्देमालाची आव्हाणाच्या कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.
(निकाल खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.)

**(डी.एस.खोत)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय क्र.३, श्रीरामपूर.

दि. १५.०१.२०२४

-